दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : १३३
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.com
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, बुधवार, दि.२५ डिसेंबर २०२४












# लाडक्या बहिणींना सांगितले २१०० मिळाले मात्र १५००

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** लाडकी बहीण योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या खात्यात लाभाची रक्कम पुन्हा जमा होण्यास आजपासून सुरुवात झाली आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर या योजनेतील निधी आचारसंहितेमुळे अडकला होता. परंतु, आता नव्याने स्थापन झालेल्या सरकारने पुन्हा एकदा ही योजना कार्यान्वित केली असून पात्र महिलांच्या खात्यावर दीड हजार रुपये जमा होण्यास सुरुवात झाली आहे.



१२ लाख ८७ हजार बहिणींच्या खात्यात या योजनेआंतर्गत दिला जाणारा सन्मान निधी आज जमा करण्यात आला आहे. येत्या दोन ते तीन दिवसात उर्वरीत लाभार्थ्यांच्या खात्यात सन्मान निधी जमा केला जाणार आहे अशी माहिती आदिती तटकरे यांनी दिली. तसंच, आधार प्रमाणिकरण होत नसल्याने अनेक महिला या योजनेच्या लाभापासून वंचित राहिल्या होत्या. पण आता ज्या महिलांचे आधार प्रमाणीकरण झाले, त्यांनाही लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा होणार आहे.

**दीड हजार मिळाले, २१०० रुपये कधी मिळणार?**

महायुती सरकारने लाडकी बहीण योजनेतील सन्माननिधी वाढवण्याची तरतूद त्यांच्या वचननाम्यात दिली होती. परंतु, सध्या प्राप्त झालेल्या हप्त्यानुसार महिलांना केवळ १५०० रुपये मिळत आहेत.

त्यामुळे निवडणुकीच्या आधी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे महिलांना २१०० रुपये कधी मिळणार असा प्रश्न उपस्थित होत आहे. यावर आदिती तटकरे म्हणाल्या, राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पहिल्या पत्रकार परिषदेत सरकारची योजना सांगितली होती. पुढच्या वर्षी अर्थसंकल्प मांडण्यात येईल. तेव्हा सकारात्मक पद्धतीने विचार केला जाईल. सध्या आचारसंहितेच्या कालावधीत स्थगित केलेल्या निधी वितरणाची सुरुवात करण्यात आली आहे, असं आदिती तटकरे यांनी एबीपीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे.

**नव्याने नोंदणी केव्हा सुरू होणार?**

विविध तांत्रिक अडचणींमुळे काही महिलांना अर्ज करता आलेला नाही. त्यामुळे नव्याने नोंदणी केव्हा सुरू होणार असा प्रश्न महिलांकडून विचारला जातोय. त्यावर आदिती तटकरे म्हणाल्या, नोंदणी करण्याची शेवटची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत होती. तोपर्यंत अडीच कोटींपेक्षा जास्त महिलांची नोंदणी झाली आहे. अद्याप पुन्हा नोंदणी सुरू करण्यासंदर्भात चर्चा झालेली नाही. पात्र महिलांपर्यंत सध्या आम्ही सन्माननिधी पोहोचवण्याचा प्रयत्न करत आहोत.

**अर्जांची पुन्हा छाननी होणार?**

दरम्यान, या योजनेसाठी निकष बदलण्यात येणार असल्याची चर्चा होती. त्यामुळे अनेक लाभार्थी महिला या योजनेतून अपात्र ठरतील अशी शक्यता वर्तवण्यात आली. पात्र महिलांच्या अर्जांची पुन्हा छाननी होणार का? यावर आदिती तटकरे म्हणाल्या, यासंदर्भातील भूमिका मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केली आहे. याबाबतची पुनर्पडताळणी करण्यात येईल. तक्रारी आल्या असतील तर योग्यपद्धतीने तपासून घेतल्या जातील. सरसकट पुनर्पडताळणी घेण्याचा निर्णय घेण्यात आलेला नाही. निकषही बदलले नाहीत. स्थानिक पातळीवर, तलाठी कार्यालय, योजना पोहोचवण्याऱ्या यंत्रणा, आशा सेविका, सेवा सुविधा केंद्रात लाभार्थ्यांसंदर्भात तक्रारी प्राप्त झाल्या तर त्याची चौकशी केली जाईल. डीबीटी करताना जाणवलं की एकाच आधारकार्डवर नोंदणी झालेल्या आहेत, तेव्हा आम्ही कारवाई करणार आहे, असंही आदिती तटकरे म्हणाल्या.

## हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील -मुख्यमंत्री फडणवीस

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२४, मुंबई :** राज्यभरात सौर उर्जेचा वापर करणारे सौर ग्राम तयार करण्यात येत आहेत. यामुळे शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध होणार असून भविष्यात या हरित उर्जेच्या माध्यमातून महाराष्ट्रातील शेतकरी दुसरी हरित क्रांती घडवतील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी प्रकल्प २.० अंतर्गत वाशिम जिल्ह्यातील उंबरठा आणि धाराशिव जिल्ह्यातील नारंगवाडी येथील प्रकल्पांचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, ऊर्जा विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव आभा शुक्ला, जलसंपदा विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव दीपक कपूर, गृहनिर्माण विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव वल्सा नायर-सिंह, वित्त विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, सहकार विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव राजगोपाल देवरा, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ. श्रीकर परदेशी यांच्यासह विविध विभागांचे प्रमुख उपस्थित होते.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेमुळे शेतकऱ्यांना दिवसा शाश्वत आणि मोफत वीज उपलब्ध होईल. राज्यातील शेतकऱ्यांना १६ हजार मेगावॅट इतकी वीज देतो. हे सर्व फीडर सौरऊर्जेवर आणण्याचे काम दोन वर्षापासून सुरू केले आहे. टप्प्याटप्प्याने हे सर्व फिडर सौर उर्जेवर आणण्यात येतील. शेतकऱ्यांना दिवसाही वीज उपलब्ध होऊ शकेल, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला उंबरठा आणि नारंगवाडी गावातील शेतकरी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

## सोन्याच्या दरात २४ तासांत घसरण

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.२४, नागपूर :** सोन्याच्या दरात चढ-उताराचे सत्र थांबण्याचे नाव घेत नाही. सोन्याच्या दरात आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोमवारी (२३ डिसेंबर २०२४) वाढ झाली होती. मात्र मंगळवारी (२४ डिसेंबर २०२४) मात्र २४ तासातच सोन्याच्या दरात घसरण झाली आहे. परंतु चांदीचे दर वाढल्याने ग्राहकांमध्ये मात्र चिंता वाढली आहे. हल्ली लग्नाचा हंगाम सुरू आहे. लग्नामध्ये वर- वधूला मोठ्या प्रमाणात सोन्याची साखळी, मंगळसूत्रासह इतरही दागिने भेट देणे अथवा स्वत:साठी बनवून घेतले जातात. त्यासाठी सगळ्याच सराफा दुकानात ग्राहकांची गर्दी होते. दरम्यान सोमवारी सोन्याच्या दरात वाढ झाल्याचे चित्र होते. मात्र मंगळवारी २४ तासात सोन्याच्या दरात किंचित घट झाल्याने ग्राहकांना मात्र दिलासा मिळाला आहे.

नागपुरात २३ डिसेंबरला सराफा बाजार उघडल्यावर सकाळी १०.३० वाजता सोन्याचे दर २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७६ हजार ५०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७१ हजार १०० रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार ७०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ७०० रुपये होते. या दरात चोवीस तासानंतर २४ डिसेंबर २०२४ रोजी सराफा बाजार उघडल्यावर घट झाली. हे दर मंगळवारी (२४ डिसेंबर २०२४) २४ कॅरेटसाठी प्रति दहा ग्राम ७६ हजार ३०० रुपये, २२ कॅरेटसाठी ७१ हजार रुपये, १८ कॅरेटसाठी ५९ हजार ५०० रुपये, १४ कॅरेटसाठी ४९ हजार ६०० रुपये नोंदवले गेले. त्यामुळे २३ डिसेंबर २०२४ रोजीच्या तुलनेत २४ डिसेंबर २०२४ रोजी नागपुरात सोन्याच्या दरात घट झालेली बघायला मिळत आहे. हे दर २४ कॅरेटमध्ये २०० रुपये, २२ कॅरेटमध्ये १०० रुपये, १८ कॅरेटमध्ये २०० रुपये, १४ कॅरेटमध्ये १०० रुपये प्रति दहा ग्रामने कमी झालेले दिसत आहे. सोन्याच्या दरात किंचित घसरण झाली असली तरी येत्या काढात सोन्याच्या दरात आणखी वाढ होण्याचे संकेत सराफा व्यवसायिकांकडून दिले जात आहे. त्यामुळे सोने खरेदीतील गुंतवणूक आताच्या काळात लाभदायक असल्याचा सराफा व्यवसायिकांचा दावा आहे.

**चांदीच्या दरात वाढ !**

नागपुरातील सराफा बाजारात २३ डिसेंबरला सकाळी बाजार उघडल्यावर १०.३० वाजता चांदीचे दर ८८ हजार ५०० रुपये प्रति किलो होते. हे दर २४ डिसेंबरला दुपारी ८८ हजार ७०० रुपये प्रति किलो नोंदवले गेले. त्यामुळे २३ डिसेंबरच्या तुलनेत नागपुरात २४ डिसेंबरला चांदीच्या दरात २०० रुपये प्रति किलो वाढ नोंदवली गेली आहे.

# सलग दुसऱ्या दिवशी हवेची स्थिती खालावलेलीच !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, मुंबई :** गेले अनेक दिवसांपासून मुंबईतील हवेची गुणवत्ता खालावलेली आहे. मुंबईची हवा जरी 'मध्यम' श्रेणीत नोंदली गेली असली तरी बुधवारी मुंबईच्या वेगवेगळ्या केंद्रावर हवेची श्रेणी 'वाईट' असल्याची नोंद झाली. या भागातील हवा सलग दुसऱ्या दिवशी खालावलेली होती.



वातावरण बदल आणि बांधकामे यामुळे मुंबईच्या हवेवर सातत्याने परिणाम होत आहे. यामध्ये पीएम२.५ चे प्रमाण अधिक आहे. समीर ॲपच्या नोंदीनुसार बुधवारी काही भागात पीएम २.५ चे प्रमाण अधिक होते. माझगाव, नेव्ही नगर, कुलाबा, मालाड आणि बोरिवली येथे 'वाईट' हवेची नोंद झाली. येथील हवा निर्देशांक अनुक्रमे २०३, २५२, २०४, २३२ इतका होता. तर इतर भागात मध्यम श्रेणीत हवा गुणवत्ता नोंदली गोली. तेथील निर्देशांक १०० ते २०० पर्यंत होता. मुंबईकरांना सध्या प्रदूषणाचा त्रास होत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मुंबईकर चिंतीत आहेत.

**समीर ॲपच्या नोंदीनुसार बुधवारी झालेली हवेची नोंद**

वरळी – १३७
भायखळा– १२०
शीव – १४३
चेंबूर – ११७
देवनार – १५८
कुर्ला – ११०
मुलुंड – ११८

**मुंबईचा पारा २७ अंशावार**

मुंबईच्या कमाल तापमानात सोमवारपासून घट होत आहे. संपूर्ण नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यातील २० दिवस कमाल तापमान चढे असताना सलग दुसऱ्या दिवशी कमाल तापमान ३० अंशाच्या आत नोंदले गेले. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी २७.५ अंश सेल्सिअस, तर, सांताक्रूझ केंद्रात २९ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. कुलाबा केंद्रात सोमवारच्या तुलनेत मंगळवारी १.५ अंशानी कमी तापमान नोंदले गेले. किमान तापमानात देखील किंचित घट झाली आहे.

# पुण्यासाठी दोन महापालिका आवश्यक : चंद्रकांत पाटील

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२४, पुणे :** 'शहराच्या वाढत्या भौगोलिक क्षेत्राचा विचार करता शहरासाठी दोन महापालिका कराव्या लागतील. दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी उशीर चालणार नाही. कटक मंडळांच्या विलीनीकरणाबाबतही तातडीने निर्णय घ्यावा लागेल,' अशी स्पष्ट भूमिका राज्याचे उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी मंगळवारी मांडली. जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमित सुरू होईल. त्या वेळी हे विषय प्राधान्यक्रमांचे असतील, असेही ते म्हणाले.




पुणे श्रमिक पत्रकार संघाच्या वतीने नवनिर्वाचित आमदार आणि मंत्र्यांसमवेत 'शहर विकासाची २५ वर्षे' या विषयावर वार्तालाप आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी ते बोलत होते. 'समाविष्ट गावे आणि वाढत्या लोकसंख्येमुळे महापालिकेवर ताण येत आहे. त्यामुळे पुण्यासाठी पूर्व आणि पश्चिम अशा दोन स्वतंत्र महापालिका कराव्या लागतील,' असा मुद्दा राष्ट्रवादी काँग्रेसचे हडपसर विधानसभा मतदारसंघाचे आमदार चेतन तुपे यांनी मांडला. हा धागा पकडून चंद्रकांत पाटील यांनी स्वतंत्र महापालिकेची आवश्यकता अधोरेखित केली.

'शहरामध्ये केवळ एक महापालिका असून चालणार नाही. राजकीय, सामाजिक आणि भौगोलिक असे अनेक विषय गुंतले आहेत. त्याचा विचार करून शहराचे काही भाग करावे लागतील. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) शहरात असले, तरी ती महापालिका नाही. त्यामुळे दोन स्वतंत्र महापालिका करण्यासाठी आता उशीर करून चालणार नाही,' असे पाटील यांनी स्पष्ट केले.

पाटील म्हणाले, 'महापालिकेचे विभाजन होणे गरजेचे आहे. त्यामुळे या संदर्भात व्यापक चर्चा करावी लागेल. नावांचा प्रश्नही अशा वेळी महत्त्वाचा ठरतो. त्यातही पुणे शहराला एक इतिहास आहे. त्यामुळे महापालिका करताना पुणे नावाचा समावेश असावा, याबाबत सगळेच आग्रही असतील. मात्र, अशा गोष्टींवर साधकबाधक चर्चा करून विभाजनाचा निर्णय घेतला जाईल. राज्यात महायुतीला बहुमत मिळाले आहे. मंत्र्यांचे खातेवाटपही झाले आहे. त्यानुसार जानेवारी महिन्यापासून सरकारचे कामकाज नियमितपणे सुरू होईल. त्यावेळी हे विषय प्राधान्याने घेतले जातील. महापालिकेची निवडणूक एप्रिल- मे महिन्यात होण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा विषयांना उशीर करून चालणार नाही.'

समाविष्ट गावांमुळे शहराची हद्दवाढ झाली आहे. त्यामुळे आणखी उशीर न करता स्वतंत्र महापालिका आवश्यक आहे. नावामुळे अनेक प्रश्न निर्माण होतात. त्यावर चर्चा करून त्याचे स्वरूप निश्चित करावे लागेल.

**– चंद्रकांत पाटील, उच्च आणि तंत्रशिक्षणमंत्री**



# संपादकीय

## मराठी म्हणून एकत्र यायला हवे !

कल्याणच्या अजमेरा हाईट्स या उच्चभ्रू सोसायटीमध्ये धूप लावल्याच्या कारणावरून शासकीय सेवेत उच्च पदावर असणाऱ्या अखिलेश शुक्ला याने काही गुंडांकरवी एका मराठी कुटुंबाला जबर मारहाण केल्याची घटना ताजी असतानांच आणखी एका मराठी कुटुंबाला परप्रांतीयांकडून मारहाण केली गेल्याची घटना कल्याणमधील आडवली येथील रागाई इमारतीमध्ये घडली. या इमारतीमध्ये शेजारी शेजारी राहणाऱ्या दोन कुटुंबांमध्ये वाद झाला. मराठी कुटुंबातील नऊ वर्षाच्या मुलीचा विनयभंग केला गेल्याची तक्रार घेऊन मराठी कुटुंब शेजारी राहणाऱ्या पांडे कुटुंबाकडे जाब विचारण्यासाठी गेले असता पांडे कुटुंबाने मराठी कुटुंबातील तरुणासह त्याच्या पत्नीला आणि आईला जबर मारहाण केली. ज्या तरुणाला मारहाण झाली तो पोलीस कर्मचारी आहे, असे असतानाही पांडे कुटुंबाने त्यांना मारहाण केली. दोन दिवसांच्या अंतराने घडलेल्या या घटनांमुळे मराठी आणि परप्रांतीय वाद आता पुन्हा चव्हाट्यावर आला आहे.

आजमितीला राज्यात अनेक ठिकाणी झपाट्याने शहरीकरण होत चालले आहे. शहरीकरणासोबत उद्योगधंद्याची साधनेही निर्माण होतात आणि त्यासोबतच अशा ठिकाणी नोकरी व्यवसायासाठी परप्रांतीय येऊन आपले बस्तान मांडू लागतात. सकाळी ९ ते ५ नोकरी करून उरलेला वेळ कुटुंब, मित्रमंडळी यांमध्ये व्यतीत करणाऱ्या मराठी माणसांना व्यवसाय करण्यात अधिक रुची नसल्याने परप्रांतीयांचे फावते. लहानमोठे उद्योग करून ही माणसे मराठी माणसांच्या जीवावर इथेच मोठी होतात. नोकऱ्यांमध्ये कमी वेतनात अधिकाधिक काम करून ही मंडळी मालकांची मने जिंकण्यातही तरबेज असतात. शिवाय मराठी माणसांच्या तुलनेत अनावश्यक खर्च करण्यात ही दोन हात मागे असल्याने कमी काळात अधिक पैसा गोळा करण्यात यांचा हातखंडा असतो. मराठी माणसांना जिथे आयुष्यभर राबून मुंबईत स्वतःचे घर घेता येत नाही त्याच मुंबईत ही मंडळी पै पै वाचवुन सुरुवातीला भाड्याने आणि कालांतराने चांगल्या सोसायट्यांमध्ये स्वतःची घरे घेतात. गेल्या काही वर्षांत मुंबईतील मराठी माणसांचा टक्का झपाट्याने घसरत चालला आहे. ऐश आरामाची सवय असलेला मराठी माणूस आपली घरे गुजराती, मारवाडी अथवा युपी बिहाऱ्याला विकून स्वतः बदलापूर, कर्जत, कसारा, वांगणी यांसारख्या ठिकाणी इमारतींमध्ये वसू लागला आहे. मुंबईचे घर विकून आलेले गडगंज पैसे बँकेत ठेवून व्याजावर जगू लागला आहे. मुंबईचे हे लोण हळूहळू ठाणे, कल्याण आणि नवी मुंबई मध्येही पसरायला लागले आहे. परप्रांतीयांची टक्केवारी वाढू लागल्याने त्यांची मुजोरीही वाढू लागली आहे याचा प्रत्यय आज अनेक ठिकाणी दिसून येतो. मराठी माणसांना घर, दुकान भाड्याने न देणे, मराठी मुलांना नोकरीला न ठेवणे, मराठी माणसांना मोठ्या हॉटेलांत प्रवेश न देणे, शेजारी राहणाऱ्या मराठी कुटुंबाशी लहान सहान कारणांवरून वाद घालणे यांसारख्या घटना अधूनमधून उजेडात येतात आणि मग मराठी आणि परप्रांतीय वाद निर्माण होऊन वातावरण ढवळून निघते. या सर्वांत राजकीय पक्ष आपापली पोळी भाजून घेतात. सरकारवर वारेमाप तोंडसुख घेतात. काही दिवसांनी हे वाद क्षमतात. लोकही विसरून जातात आणि पुन्हा आपापल्या कामाला लागतात. मराठी माणसांची हेटाळणी करणारी, मराठी भाषिकांचा अवमान करणारी त्यांना भाषेवरून शिवीगाळ करणारी जी प्रकरणे उजेडात येतात त्यापेक्षा कितीतरी प्रकरणे शहरी भागांत प्रतिदिन घडत असतात. नोकरी करणाऱ्या मराठी माणसांना त्यांच्या परप्रांतीय मालकांकडून हीन वागणूक दिली जाणे हे तर नित्याने सर्वत्रच घडत असते. नोकरी टिकवण्यासाठी हा अवमान मराठी माणूस सुद्धा निमूटपणे सहन करत असतो.

चारी पातशाह्यांना पायाशी लोळण घ्यायला लावणारा, जगावर राज्य गाजवणाऱ्या इंग्रजांच्या उरात धडकी भरवणारा, स्वराज्याची भगवी पताका अटकेपार फडकावणारा, दिल्लीचे तख्त राखणारा मराठी माणूस आज आपली अस्मिताच विसरला असल्याने आज त्याच्यावर ही नामुष्की ओढवली आहे. 'मुंबई मराठी माणसाची आहे, कोणाच्या बापाची नाही त्यामुळे इथे आवाजही मराठी माणसाचाच असायला हवा' असे हिंदू हृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे नेहमी ठणकावून सांगत. मराठी माणसांच्या न्यायहक्कासाठी आणि त्यांना मुंबईत मानाने जगता यावे यासाठी शिवसेना या पक्षाची स्थापना केली. राजकारणापेक्षा समाजकारणाला प्रथम प्राधान्य देणाऱ्या शिवसेनेने मुंबईत मराठी माणसाचा आवाज बुलंद केला. आज तोच आवाज कुठेतरी हरवत चालला आहे. महाराष्ट्रात मराठी अस्मिता टिकवायची असेल, तर हा आवाज पुन्हा बुलंद करणे क्रमप्राप्त आहे. महाराष्ट्रात मराठी माणसांना सन्मान मिळवून देण्यासाठी जात-पात आणि राजकीय मतभेद बाजूला ठेवून मराठी म्हणून एकत्र यायला हवे.

# महाराष्ट्राचे सुपुत्र; अश्रूंचा महाकवी : साने गुरूजी

महाराष्ट्राचे सुपुत्र परमपूज्य साने गुरुजी यांची २४ डिसेंबर जयंती त्या निमित्ताने त्यांच्या जीवन कार्याचा शोध आणि वेध घेण्याचा हा प्रयत्न .

अश्रूंचा महाकवी म्हणून साने गुरुजींचे वर्णन केले जाते. ज्ञानेश्वरांनंतर महाराष्ट्राची माऊली साने गुरुजींना म्हटले जाते हे खरं.पण गुरुजींच्या वाणीने आणि लेखणीने महाराष्ट्राच्या स्वातंत्र्यपूर्व तरुण पिढीत देश प्रेमाचा आणि संघर्षाचा अंगार फुलविला हे मात्र विसरता येणार नाही. त्यांच्या जीवनातील वैचारिक आणि भावनिक आंदोलने, स्वातंत्र्य चळवळीतील सहभाग, सभा त्याग, त्यांनी उभी केलेली धडपडणारी मुलं, त्यांच्यावर असणारे त्यांचे विलक्षण प्रेम, त्या लहान मुलांत बालक म्हणून खेळणारे गुरुजी, प्रतिभाषाली साहित्यिक गुरुजी, वैजापूर अधिवेशनात कार्यकर्त्यांची फौज जमविणारे कार्यकर्ते गुरुजी, पंढरपूरचे मंदिर दलितांना खुले व्हावे म्हणून प्राणपणाने लढणारे समाजसुधारक गुरुजी, जीवनाचा लांब - रुंद प्रवास पन्नास वर्षाच्या हयातीत पूर्ण करणाऱ्या गुरुजींना त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने विनम्र अभिवादन !

आपल्याला दिसते ते गुरुजींच्या आयुष्यात उमटलेले वास्तव दर्शन. गुरुजी जसे बोलले तसे आणि तेच वागले हा निखळ पारदर्शकपणाच होय. राजकारणात सुद्धा ते सच्चे राजकारणी म्हणून जगले. आधुनिक राजकीय नेत्यांप्रमाणे ते कुठल्याही लाचलुचपतीला बळी पडले नाही. गुरुजी नेहमी सत्यासाठीच लढले. त्यांनी महाराष्ट्रभर दौरे करून आपल्या जिवंत भावनांनी हजारो तरूणांच्या मनात देश प्रेमा विषयीप्रेरणा निर्माण केली. कारण त्यांचे शब्द म्हणजे त्यांच्या हृदयातून आलेले सूर होते .

अशा या साने गुरुजींचा जन्म पालघर या गावी झाला. त्यांचे नाव श्याम सदाशिव साने अर्थात साने गुरुजी. श्यामच्या आईचा श्याम, बलसागर भारत होवो, विश्वात शोभूनी राहो, आहे आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान.अशी स्फूर्तीदायक गीते लिहिणारा श्याम .खरा तो एकची धर्म जगाला प्रेम अर्पावे। असे हे धर्माचे सत्य तत्व सांगणारा श्याम. अशा या महाराष्ट्राच्या सुपुत्रांचा जन्म कोकणात, शैक्षणिक जीवन पुण्यात तर कर्मभूमी मात्र खानदेशात .

काँग्रेसचे अधिवेशन खानदेशातील फैजपूर सारख्या खेडेगावात येणार म्हटल्यावर गुरुजींच्या अंगात उत्साहाचे वातावरण संचारले. कारण खानदेशाचे गुरुजींवर आणि गुरुजींचे खानदेशावर प्रेम.अधिवेशनाच्या खर्चासाठी गुरुजींनी सभा घेऊन निधी जमविण्यास सुरुवात केली. धुळ्यातील एरंडोल सारख्या तालुक्यात संध्याकाळी गुरुजींनी सभेमध्ये मदतीची हाक दिली. तर एका म्हातारीने पायातील चांदीचा तोडा देण्याचे ठरविले. तो पायातून निघत नव्हता. कार्यकर्ते म्हणू लागले राहू द्या, उद्या सकाळी द्या. पण म्हातारी काही ऐकेना . नको नको, आत्ताच काढून घ्या. उद्या सकाळपर्यंत कदाचित माझं मन बदललं तर ? साने गुरुजींची वाणी अगदी सामान्यातल्या सामान्य माणसाच्या मनात देश प्रेमाविषयी कशी प्रेरणा निर्माण करीत होते याचे हे जिवंत उदाहरण आहे .

साने गुरुजी हे फुला मुलांचे कवी होते, कामगार किसानांचे कवी होते. जवानांच्या जीवनातील देशदूत होते. लाख लाख लोकांच्या सभेला भारणारी ही वाणी, महाराष्ट्रातील स्वातंत्र्य सैनिकांची देव वाणी, फुलांची कोमलता, गंगेची निर्मलता, चंद्राची रमण णियता, सागरांची अनंतता आणि पृथ्वीची क्षमशिलता गुरुजीं जवळ होती . नाथा - अनाथांना मदत करणारे, पिडीत स्त्रियांना आधार देणारे गुरुजी खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे सुपुत्र होते.

साने गुरुजींचे साहित्य हे नुसते साहित्य नसून त्यांच्या मनातील कढ होते. त्यांच्या लेखनात एक जिवंतपणा होता. मोत्याची लड उलगडावी त्याचप्रमाणे त्यांची शब्द त्यांच्या लेखणीतून पाझरत असत. त्यांची 'आस्तिक 'कादंबरी' 'भारतीय संस्कृती' 'श्यामची आई' ही पुस्तके मराठी विश्वाला फार मोठी देणगी आहे. गुरुजींच्या साहित्याने महाराष्ट्राच्याच नव्हे तर संस्कृतीच्या ही सीमा ओलांडून त्याही पलीकडे झेप घेतली. म्हणून त्यांना महाराष्ट्राचे सुपुत्र म्हटले जाते. अस्पृश्यांच्या उद्धारासाठी फुले, आंबेडकरांबरोबर साने गुरुजीही अग्रेसर होते. हरिजनांच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक गाऱ्हाण्यांबाबत ते नेहमी जागरूक होते.पण मनुष्य केवळ भाकरीवर जगत नसून धार्मिक, अध्यात्मिक शांती हवी असते. त्यासाठी त्यांनी आवाज उठविला. तब्बल चार महिन्यांचा झंजावती दौरा



करून त्यांनी संपूर्ण महाराष्ट्र ढवळून काढला. माणसा माणसात प्रेरणा निर्माण केली . एवढेच करून ते थांबले नाही. समतेसाठी त्यांनी स्वतः हातात झाडू घेतला. सफाईचे काम सफाईदारपणे केले. ते अंतरीच्या उत्कंठतेने सांगत की, लेखणीच्या लालीत्यापेक्षा मला झाडूचे लालित्य अधिक प्रिय आहे. नुसती कायद्याने माणसं बदलून चालणार नाही, तर मनाने माणसे बदलली पाहिजे. त्यासाठी त्यांची सारी धडपड होती. ते आंतरभारतीचे, विश्वभारतीचे स्वप्न पाहत होते. म्हणून इराणचा महान कवी सादी त्यांना साद घालतो. तर गजनीच्या महमुदला हे जुलमी राजा - पृथ्वीवरची सत्ता कायमची नसते. हे सुनावणारा कवी फिरदौस साने गुरुजींची प्रेरणा बनते. अशा प्रकारे साने गुरुजी हे एक विलक्षण रसायन होते .

स्वातंत्र्याची पहाट उगवत होती. पण माणसा माणसातील भेदभाव गुरुजींच्या मनाला खटकत होता. तेराव्या शतकात पंढरीच्या वाळवंटात थकून राहिलेली पावले विसाव्या शतकाच्या मध्यास १९४७ साली अशीच आणखी एका समाज परिवर्तनवादी बंड वाल्याने जीवाच्या आकांताने पुढे नेण्याचा प्रयत्न केला. त्या बंड वाल्याचे नाव होते साने गुरुजी. स्वातंत्र्य पावला - पावलाने जवळ येऊ लागले. पण पालगडच्या पंढरीला अर्थात साने गुरुजींना पंढरपूरच्या पांडुरंगाची पाऊले दिसू लागली. स्वातंत्र्य येईल पण समानता येणार नाही. अस्पृश्यतेचा अडसर तसाच राहील. जन्माधिष्ठित जातीयता गेली नाही तर या स्वातंत्र्यावर मरण कळा येईल. ते सांगत की, चर्चमध्ये सारे ख्रिस्ती एकत्र जमतात. मशीदीमध्ये सारे मुस्लिम एकत्र जमतात, तर आपल्या मंदिरामध्ये सारे हिंदू का एकत्र जमू शकत नाही ? धर्म हा जोडण्यासाठी असतो. तोडण्यासाठी नाही. सुरुवातीला गुरुजींना पंढरीच्या मंदिराचे विश्वस्त बडवे, सनातनी मार्तंड यांनी प्रचंड विरोध दर्शविला. परंतु गुरुजीं आपल्या ध्येयापासून अजिबातही बाजूला सरले नाही. प्रथमतः गांधीजींनी देखील विरोध दर्शविला. परंतु खरे मर्म कळल्यावर त्यांनीही उपोषणास पाठिंबा दिला. गुरुजींच्या तपशीला अखेर न्याय मिळाला १ मे पासून चाललेल्या उपोषण १० मे १९४७ संपले. अखेर पंढरीचा पांडुरंग हरीजणांना उरा उरी भेटला याचे सारे श्रेय साने गुरुजींना जाते. कारण तो खरा लढा होता, ती खरी समता होती.

मात्र पंढरीचे मंदिर दलितांसाठी खुले व्हावे हे गुरुजींसमोर केवळ एक प्रतीक होते. खऱ्या अर्थाने हिंदू धर्मावरचा कलंक पुसला पाहिजे आणि अस्पृश्य माणसाला माणूस म्हणून जगता आले पाहिजे यासाठी त्यांची सारी तळमळ होती. म्हणून बहिणाबाईंनी म्हटले आहे, अरे माणसा माणसा तू कधी होशील माणूस तुझ्यापेक्षा गोठातलं जनावर बरं म्हणजे बहिणाबाईंना जो माणूस अपेक्षित होतात ते माणूस पण साने गुरुजींनी अनेक वर्षांपूर्वी अनुभवले होते, उपभोगले होते .

१५ ऑगस्ट १९४७ ला देश स्वतंत्र झाला पण देवघर मोडून पडले. चिता ही प्रेताला जाळते पण चिंता ही जिवंत माणसाला सतत जळत ठेवते. हे गुरुजींच्या बाबतीत प्रकाशाने खरे ठरले. रवींद्रनाथ टागोरांनी म्हटले आहे की, तुकारामादिकांच्या संतांच्या मालिकेत मी गुरुजींची निशंक गणना करत. परंतु मृत्यूची ओढ त्यांच्या आत्म्याला सतावत होती. कदाचित आदर्श मूल्यांना त्यांनी हृदयाशी कवटाळले होते त्यात व प्रत्यक्ष वास्तवात असलेली प्रचंड दरी त्यांना भयानक वाटत असावी म्हणजे स्वातंत्र्या नंतरचे विदारक दृश्य पाहून गुरुजींनी ११ जून १९५० रोजी अखेरचा श्वास घेतला. परंतु त्यांच्या या कृत्यास पळकुटेपणा मात्र मुळीच म्हणता येणार नाही.कारण प्रकाश आणि छाया यांच्यात सिमा रेषा सूक्ष्म असते. त्याचप्रमाणे साने गुरुजी त्यांच्या साहित्यातून सतत एक दिव्यतेचा प्रकाश किरणच देत राहतात.

**- लेखक -**

**भाऊसाहेब महाडदेव (विंचूर)**

## नाताळ..

उत्सव प्रिय माणूस
उत्साही न् अवखळ
धमाल करी पुष्कळ
सुख वाहे खळखळ

सण कुठल्याधर्माचा
सामील होती सकळ
विसरली जात पात
मैत्री केवळ निखळ

शुभेच्छा निर्झर वाहे
हृदयास करी निर्मळ
निमित्ताने सान थोर
येतात आनंदे जवळ

येशूख्रिस्त जन्मदिन
करुणा ये विसृंखळ
दयामहासागर लाटा
अंतरात घेती उसळ

सांभाळ गं मदरमेरी
लेकरेअसे निक्खळ
लोभ द्वेष मत्सराची
वृत्ती संहारी विखळ

भरकटल्या बुध्दीला
वाट दाखवी सरळ
माफीनामामागताना
अमृत व्हावी गरळ

क्रिसमस ट्रिवरती रे
यावी सद्वृत्ती फळ
हीचं भेट सांता तुझी
रे सण संपूर्ण सफळ

**- हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**


अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी


# नेतृत्व, कर्तृत्व, वक्तृत्व यांचा सुरेख संगम अटलबिहारी वाजपेयी

कवी मनाचे, प्रखर राष्ट्रवादी अशी प्रतिमा असणारे भारताचे माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची आज जयंती. २५ डिसेंबर १९२४ रोजी जन्मलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांनी कानपूरमधून राज्यशास्त्रात एम ए ची पदवी मि



ळवली. पदवी मिळविल्यानंतर वाजपेयी हे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्णवेळ कार्यकर्ते बनले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे काम करता करता त्यांनी पत्रकारिताही केली.

राष्ट्रधर्म, पांचजन्य आणि वीर अर्जुन या नियतकालिकांसाठी त्यांनी पत्रकारिता केली. १९४२ च्या भारत छोडो आंदोलनात भाग घेऊन त्यांनी राजकीय कारकीर्द सुरू केली. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी १९५१ साली जनसंघांची स्थापना केली. जनसंघाच्या स्थापनेत श्यामाप्रसाद मूखर्जी इतकाच अटलबिहारी वाजपेयी यांचाही वाटा आहे. १९५७ साली पहिल्यांदा ते जनसंघाच्या तिकिटावर लोकसभेत पोहचले. आपल्या अभ्यासपूर्ण भाषणांनी त्यांनी लोकसभेत ठसा उमटवला.

त्यांचे भाषण ऐकण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान पंडित नेहरू आवर्जून लोकसभेत उपस्थित राहत. पंडित जवाहरलाल नेहरु अटलजींच्या वक्तृत्वाने मोहित झाले होते. अटलबिहारी वाजपेयी एकदिवस भारताचे पंतप्रधान बनतील असे भविष्य त्यांनी वर्तवले होते. अटलबिहारी वाजपेयी सलग ९ वेळा लोकसभेवर निवडून गेले होते. १९६८ साली ते जनसंघाचे अध्यक्ष बनले. पक्षाध्यक्ष या नात्याने जनसंघ घरोघरी पोहचवण्याचे काम त्यांनी केले. त्याचवेळी विरोधी पक्षाची भूमिकाही त्यांनी तितक्याच प्रभावीपणे बजावली. १९७५ साली पंतप्रधान इंदिरा गांधी यांनी देशात आणीबाणी लागू केली. या आणीबाणीला त्यांनी प्रखर विरोध केला. आणीबाणीला विरोध केला म्हणून त्यांना दोन वर्षाचा कारावास भोगावा लागला. आणीबाणी उठल्यानंतर इंदिरा गांधी यांना पदावरुन हटवण्यासाठी सर्व विरोधी पक्ष एकत्र येऊन त्यांनी जनता पार्टी नावाचा पक्ष स्थापन केला. अटलबिहारी वाजपेयी यांनीही आपला जनसंघ हा पक्ष जनता पार्टीमध्ये विलीन केला. पण अवघ्या तीन वर्षात १९८० साली त्यांनी मुंबईत भारतीय जनता पार्टीची घोषणा केली. मोरारजी देसाई यांच्या मंत्रिमंडळात अटलजी परराष्ट्रमंत्री होते.

परराष्ट्रमंत्री या नात्याने त्यांनी इतर देशांशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. परराष्ट्रमंत्री म्हणून संयुक्त राष्ट्र संघात त्यांनी हिंदीतून भाषण केले. संयुक्त राष्ट्र संघात हिंदीतून भाषण करणारे ते पहिले नेते होते. १९९६ साली ते पहिल्यांदा पंतप्रधान बनले पण लोकसभेत बहुमत सिद्ध न करता आल्याने अवघ्या तेरा दिवसांतच त्यांचे सरकार पडले. त्यानंतर १९९८ साली ते पुन्हा पंतप्रधान बनले यावेळी मात्र त्यांचे सरकार तेरा महिने टिकले. पण या तेरा महिन्यात त्यांनी अनेक महत्वाचे निर्णय घेतले. अमेरिकेच्या दबावाला बळी न पडता त्यांनी अणुस्फोट करून आपले सामाजिक व वैज्ञानिक श्रेष्ठत्व सिद्ध केले. ते पंतप्रधान असतानाच भारताने कारगिल युद्ध जिंकले होते. जय जवान, जय किसान, जय विज्ञान ही घोषणा त्यांनी दिली. १९९९ साली तिसऱ्यांदा ते पंतप्रधान बनले. यावेळी मात्र त्यांचे सरकार पाच वर्ष टिकले.

सलग पाच वर्ष पंतप्रधान राहिलेले ते पहिले बिगर काँग्रेसी पंतप्रधान होते. अटलबिहारी वाजपेयी हे उत्कृष्ट कवी होते त्यांच्या सर्व कविता लोकप्रिय झाल्या त्यातील आओ फिरसे दिया जलाये.... ही कविता लोकांना खूप आवडली. त्यांनी सुमारे ४० पुस्तकांचे लेखन केले. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कार त्यांना अनेकवेळा मिळाला. सरकारने त्यांना पद्मविभूषण हा मानाचा पुरस्कार देऊन गौरविले. भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च पुरस्कार त्यांना मरणोत्तर प्रदान करण्यात आला. नेतृत्व, कर्तृत्व आणि वक्तृत्व यांचा सुरेख संगम असलेल्या अटलबिहारी वाजपेयी यांचे १६ ऑगस्ट २०१८ रोजी निधन झाले. अटलबिहारी वाजपेयी यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!

**- श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**


This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

